# संकल्प

संध्या आलेराव
बावधन पुणे
९८२०१३०९८२

(१)

मनाने बुद्धिला मागीतलेले वचन किंवा स्वतः स्वतःशी केलेला वादा म्हणजे संकल्प. इतरांवर सोडून स्वतःलाच दिलेले वचन किंवा संदिग्ध अवस्थेत ठरवलेले एक निश्चीत कार्य म्हणजे संकल्प. ज्याच्या पुर्तीबद्दल साशंक असतोच आपण, पण प्रामाणिकपणाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार असतो. संकल्पचा शब्दशः अर्थ म्हणाल तर दृढनिश्चय - Resolution (अनुकूल वा प्रतिकूल परीस्थीतीत हो कार्य पूर्णच करणे)

असं म्हणणं आहे पुर्वजांच, पूजा अर्चा, धार्मिक विधींचे संपूर्ण फळ संकल्प घेतल्याशिवाय मिळत नाही. तर आपण असं ही म्हणू या - वासना, लालसा आदिंपासून मुक्त कर्मकांड संकल्पाने होतात.

सर्वसाधारण संकल्प घेण्याचे क्षेत्र हे धार्मिक, सामाजीक, स्वास्थ ह्यासाठी घेतलेले असतात. किंवा काही विचार एकत्र करुन ही असू शकतात. मोठे मोठे महान व्यक्तीत्व जास्त संकल्प - देशभक्ती, समाजसेवा चारित्रीक गुण वाढविण्यासाठी घेतात. जसे -

सुभाषचन्द्र बोस - "तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूँगा"

लोकमान्य टिळक - स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच".

महात्मा गांधी - "अहिंसा परमो धर्मः"

वीर सावरकर - "घरचा नाही, देशाचा संसार (प्रपंच) करीन"

आणि अशा लोकांना संकल्प कसा पूर्ण होईल याचा विचार करावा लागत नाही. ते तो पूर्ण करण्यासच घेतात. मग त्यात त्यांच आयुष्य ही त्यातच का संपेना. म्हणजेच ते आपल्या सामान्यांसारखा, नूतन वर्षासाठी किंवा काही काळासाठी संकल्प किंवा Resolution घेत नाही. कायमच जीवन संकल्प करतात.

पण मग सामान्यांच काय? तर आपल्यासारखंच सर्वजण नववर्षाला टप्पा टप्पाने संकल्प घेत असतात.

सर्वच शिखरावर उंच उडी ना शरीरी नाही घेऊ शकत पण (२)
एक पायरी चढण्याची जिद्द ठेवतात. एक एक टप्पा पार करू शकतात.

त्यातील काही पायऱ्या मी माझ्या सांगते, माझ्याच शब्दात. असेन १०-११ वर्षांची वगैरे ५ वी किंवा सहावी इयत्तेत तब्येतीने नाजूक पहिली दुसरीची वारंवार इतपत. सरू-श्री-चुलत मावशी चिडवायची, "फुंकर मारली तर उडून जाशील". "पैर मोमबत्ती, हाथ अगरबत्ती". अभ्यासात १ली यायचे त्यांसही नाहीत काहीच राग. खायला प्यायला शिक शक्ती वाढव". मनाने संकल्प घेतला "मारुती" शक्तिमान व वीर. मग जवळच्या मंदिरात प्रथम ८, मग ११ व शनिवारी १०८ प्रदक्षिणा व रात्री रोज आरतीला जायचेच. हा नियम वर्षभर नाही तर, मंदिराजवळ आमचे घर असेपर्यंत पाळला. देव प्रसन्न झाला की नाही न कळे तरी ही आम्ही बरीच वर्षे तसेच असो. सशक्त शरीर झाले नाही पण ठरवलेले संकल्प पूर्ण करण्यास मन कणखर झाले मात्र. लग्नानंतर मुंबई मालाडला होतो. गोंदवलेकर महाराजांचा मठ जवळच होता पण नवरोजी सदैव बिझी. म्हणून आम्ही दर रविवारी उपासनेला नाही पण दर्शन व आरतीला न चुकता असायचो. मालाड सोडेपर्यंत. ते ह्यात असेपर्यंत. वाल्मीकी रामायण दोघांनी मिळूनच वाचायचो रात्री झोपण्यापूर्वी अगदी नियम चालवायला एक पान किंवा चार ओळी सुद्धा. हे खरं स्वतःला शिस्तीत ठेवायला स्वतःच शिकले. वर्षा शेवटी आपल्या उत्पन्नाचा एक भाग गरजूंना दिलाच पाहिजे हा नियम अजून ही पाळण्याचा प्रयत्न करते. विषयच हा घेतल्याने आज ओघानेच सांगितले. ह्याची एकच आवड बघून नवल वाटले त्यावेळेस ठरवताना.

आणि आताचा दृष्टिकोण विचारला तर मला "सत्य" आणि "स्वच्छ कर्मातच" ईश्वर दिसतो. त्यासाठी मंदिरात वास्तव्य, नियम, संकल्प आवश्यक वाटत नाही. तरी ही "जगत नियंत्याने" विकारांसह हा मनुष्य नामक मातीचा पुतळा बनविला आहे. मग त्याला संयम व शिस्त शिकवायला टप्पा टप्प्याने संकल्प करून तडीस नेण्याचे प्रयत्न करण्यास हरकत नाही.

(३)

१) थोडं, सर्व गोष्टींमधून निवृत्त व्हावं. म्हणजे जे होतंय, होणार आहे, ईश्वरी इच्छा समजून स्थिर रहावे, असे वाटते.

२) क्रोध, मोह, द्वेष या भावनांना प्रयत्नपूर्वक कुंपण घालावे, असे काही संकल्प.

३) गरजा, विलासीवृत्ती नियंत्रित करत थोडा आर्थिक ओघ, मदतीचा हात असहाय्यांना देत रहावा काय? असे मन तयार करणे.

४) आणि आता येणाऱ्या नवीन वर्षासाठी म्हणाल तर एकच ध्येय ठेवावे ही मानिषा आहे - "शब्द साधना"

१.) ही साधना अखंड, निरंतर समतोल, समृद्ध करावी. मग संकल्प हा की - शब्द तोलून मापून बोलावे. म्हणजे भावनांना आवर घालता येईल.

२) शब्द समृद्ध करणे - लिखाणाचा दर्जा उंचावीत जाण्याचे प्रयत्न चालू ठेवायचे. निवडक वाचनासाठी चांगल्या आणि चांगल्यासाठीच प्रवृत्त व्हावे. निरर्थक टाळावे.

३) सुन्दर "शब्द" प्रसारण - म्हणजे विविध माध्यमाने आपल्याला जे चांगले सापडेल ते वक्तृत्वा द्वारे ही सर्वांसमोर नेण्याचा प्रयत्न करणे.

तर काही दिवस शिल्लक आहे नूतन वर्ष सुरु होण्याला व शिल्लक आहे काहीच आयुष्य. बघू कुठला संकल्प करायचा. मागणे ईश्वराकडे एवढेच, देशभक्ती, स्त्रीशक्ती व भारतीय संस्कृती साठी सरते शेवटी - ईश्वरा तुझ्याच साठी ही जिभ काया, वाचा, मनाने अशी अविरत चालू ठेव.

तू बुद्धी दे, तू तेज दे
नव चेतना विश्वास दे
जे सत्य सुन्दर सर्वथा, आजन्म त्याचा ध्यास दे.
तू बुद्धी दे तू तेज दे

हरि: ॐ

